# मिरा भाईंदर महानगरपालिका

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धी पत्रक**

- **बाप्पा माझा शाडुचा उपक्रम**
- **पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी महापालिकेचे प्रयत्न**

**मिरा भाईंदर - बुधवार, १५ जानेवारी २०२५:** मिरा भाईंदर महानगरपालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पुढाकार घेतला असून यंदा "बाप्पा माझा शाडुचा" हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांना शाडू मातीपासून बनवलेल्या गणेशमूर्तींच्या वापराबाबत जागरूक करणे आणि प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण रोखणे हा आहे. या अभियानाची सुरुवात जानेवारी महिन्याच्या उत्तरार्धात होणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सागरी परिसंस्थेचे संरक्षण व्हावे, नैसर्गीक तलावांमधील प्रदूषण रोखता यावे या उद्दीष्टाने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा निश्चित केला आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती न वापरण्याबाबत शासनाचे आणि माननीय उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. या बंदिच्या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. त्यासाठी "बाप्पा माझा शाडुचा" हे अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानात नागरिकांना अधिकाधिक सहभागी करून घेण्यासाठी तसेच यासंदर्भातील मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी गुरुवार दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृहात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चेत, "बाप्पा माझा शाडुचा" या संकल्पनेची माहिती दिली जाणार आहे. यासह, पर्यावरणपूरक गणेशोत्सव राबविण्यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात येणार आहेत. शाडू मातीचे वितरण, प्रशिक्षण, विक्री केंद्रे, मूर्ती संकलन केंद्रे, विसर्जनाचे नियोजन आदी सर्व विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. तसेच या चर्चेत सर्वसामान्य नागरिक, पर्यावरण तज्ज्ञ, मूर्तीकार आणि इतर व्यक्तींच्या सूचना, सल्ले घेऊन धोरण आखले जाणार आहे. त्या धोरणानुसार दर महिन्याला कामाचा आढावा घेतला जाणार आहे.

**कोट**

"बाप्पा माझा शाडुचा" या संकल्पनेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणे हे महानगरपालिकेचे ध्येय आहे. या उपक्रमाद्वारे बाप्पावरील श्रद्धा आणि पर्यावरणावरील श्रद्धा यातील वाढलेले अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पर्यावरण आणि सण-उत्सव यांतील समतोल राखण्यासाठी, नागरिकांचा देखील त्यात सक्रीय सहभाग होणार आहे. जनसहभागातून, साजरा होणाऱ्या गणेशोत्सवातून, वसुंधरेला प्रदूषणमुक्त आणि हरित करण्याचा संकल्प असणार आहे. त्यामुळे सर्व नागरिकांना आवाहन आहे, पर्यावरण संवर्धनासाठी, महापालिकेला साथ द्या आणि मोठ्या प्रमाणात या अभियानात सामील व्हा.

**मा. श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), मनपा आयुक्त तथा प्रशासक**